गुरुवार दि.१३ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१७९ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# मी भाजपची राष्ट्रीय नेता तरीही सुरेश धसांची माझ्या वर टीका; पंकजा मुंडे करणार भाजप श्रेष्ठींकडे तक्रार

## धस–धनंजय मुंडेंच्या भेटीवरही सवाल ;मला खूर्चीची अपेक्षा नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मी भाजपची राष्ट्रीय नेता असताना भाजप आमदार सुरेश धस यांनी माझ्यावर थेट आरोप केला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना 'समज' द्यावी, असे पंकजा मुंडे यांनी एका मराठी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे.पंकजा मुंडे म्हणाल्या की, सर्वत्र कॅमेरे घेऊन फिरणाऱ्या आमदार सुरेश धस यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट गुपचूप का घेतली याचे उत्तर त्यांनी महाराष्ट्रातील जनतेला दिले पाहिजे.पंकजा मुंडे म्हणाल्या की, गेली ३ वर्षे धनंजय मुंडे बीडचे पालकमंत्री होते. भाजप सत्तेत होती, तेव्हा सुरेश धस आमदार होते. तेव्हाही वाल्मीक कराड काम करत होते पण सुरेश धस यांनी तेव्हा त्यांची तक्रार केली नाही मी मंत्री झाले आणि तेव्हाच धस यांनी त्यांची तक्रार केली. मी मंत्री झाल्यावरच त्यांनी बीडमधील वाढती गुन्हेगारी दिसली असेही त्यांनी म्हटले आहे.पंकजा मुंडे म्हणाल्या की, बीडमधील प्रकरणाशी माझा काही संबंध नसताना आणि मुचख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी हिवाळी अधिवेशनात न्याय मिळवून देत आरोपींना सोडणार नाही असा शब्द दिला. पण तरीही आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण इतकं का पेटवले?, असा सवाल त्यांनी केला आहे. तर मी भाजपची राष्ट्रीय नेता असूनही त्यांनी माझ्यावर थेट आरोप केले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी त्यांना समज द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.पंकजा मुंडे म्हणाल्या की, मुख्यमंत्रीपदाचा जे वक्तव्य ते १० वर्षांपासून मला चिकटले आहे. पक्षीय पातळीवर त्या वक्तव्याचा काहीच परिणाम झाला नाही. माझ्या केंद्रातील, राज्यातील नेत्यांनी यावर काही चर्चा केली नाही. उलट आम्ही या वक्तव्याची मस्करी केली, की कशी बातमी झाली आहे. पक्षांने मला कधीही जाब विचारला नाही. मला आता कळते की आपन एखाद्याला उत्तर देताना त्याचा वेगळा अर्थ निघू नये याची काळजी घ्यावी.पंकजा मुंडे म्हणाल्या की, मला कोणत्या खूर्चीची अपेक्षा नाही. जी खूर्ची मिळेल ती बळकट करण्याकडे माझे लक्ष असते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी भाजपने माझा स्टार प्रचारकांच्या यादीत समावेश केला, तेव्हा माझ्या बाबांना फार आनंद झाला होता. ते माझ्या आईला म्हणाले होते बघ आपली पंकजा मोदींची स्टार प्रचारक आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला सत्ता मिळाली आणि माझा मंत्रिमंडळात समावेश होऊन ग्रामविकास खात्याची जबाबदारी माझ्याकडे आली.



### रक्त तपासणी विभाग वेळेपूर्वीच कुलूप बंद

# उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची गैरसोय,खाजगी लॅबमध्ये आर्थिक झळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील उपजिल्हा रुग्णालय येथे रुग्णालयातील रक्त तपासणी विभाग हा वेळेपूर्वीच बंद होत असल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक झळ सोसावी लागत आहे त्यामुळे रुग्ण आणि नातेवाईकांमधून रुग्णालयाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.बीड –जालना राष्ट्रीय महामार्गावर उपजिल्हा रुग्णालय हे गरजू रुग्णांसाठी मोठा आधार आहे मात्र रुग्णालयाच्या कारभाराबाबत तसेच सुविधा या सध्या रामभरोसे असल्याचे दिसून येत आहे.




त्याबाबत नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे उपजिल्हा रुग्णातील कर्मचाऱ्यांच्या येण्याच्या आणि जाण्याच्या वेळा निश्चित नसल्याने नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे उपजिल्हा रुग्णालयातील नागरिकांच्या सेवेसाठी असलेले रुग्णालय हे सकाळी वेळेत सुरू होत जरी असले तरी दुपारनंतर वेळेवर येत नसल्याची चर्चा सध्या सर्व परिसरात सुरू आहे परंतु बंद होण्याच्या पूर्वीच अनेक सेवा बंद केल्या जात असल्याची नागरिकांमध्ये जोरदार चर्चा चालू आहे. रक्त तपासणी लॅब ही सातत्याने दररोज सकाळी उघडली जाते परंतु दुपारनंतर या विभागांची लॅब बंद असल्याचे सांगितले जाते रुग्णालयाचे अधीक्षक हे कर्तव्यदक्ष असून रुग्णालयातील कर्मचारी वर्ग त्यांना मानावे असे सहकार्य करीत नसल्याची चर्चा आहे त्यामुळे अनेक रुग्णांमध्ये संभ्रम निर्माण होतं आहे बाह्य रुग्ण विभागात रुग्णांची रांग असताना देखील वेळेच्या आधी या ठिकाणी रक्त तपासणीसाठी असणारी प्रयोगशाळा देखील वेळेच्या आधीच बंद करून कर्मचारी कुलूप लावून निघून जात असल्याचा आरोप यावेळी रुग्णांनी केला रुग्णांना मात्र बाहेरून रक्त तपासणीसाठी खिशाला आर्थिक झळ सोसावी लागत आहे मात्र यावर कुणी पुढे येऊन बोलायला तयार होत नाही रुग्णालयात रुग्णांना सेवा देण्याच्या नावाखाली कर्मचारी मात्र त्या रुग्णांना उद्धट बोलून त्यांची बोलती बंद केल्याचा प्रकार अनेक वेळा घडला आहे. त्यामुळे तात्काळ वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष घालून संबंधित कर्मचाऱ्यांना वेळीच सूचना देऊन लॅब सुरू करण्यात यावी अशी मागणी टायगर ग्रुप चे युवा नेते संकेत भैय्या गांगुर्डे यांनी केले आहे.

# कावळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा जंगी स्वागत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर तालुक्यातील कावळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा लोहा – कंधार मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा अध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस दिव्यांग सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष रामदास पाटील सोमठाणकर, यांचा जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी मिलिंद सोनकांबळे कावळगावकर (प्रदेश संघटक:राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक विभाग)माजी सरपंच बाळासाहेब देशमुख, माजी सरपंच मारोती शिरगिरे, युवा नेते निलेश देशमुख, संग्राम येलबुगडे, शेषराव येलबुगडे, मारोती घुळेकर, बालाजी घुळेकर,सुग्रीव फुलारी, मारोती बिरादार,सर्व गावकरी उपस्थित होते.

# सेनगाव नगरपंचायतीच्या वतीने प्लास्टिक पडणे हटाव मोहीम राबवण्यात आली

### अनेक दुकानदाराकडून केली प्लास्टिक पन्नी केली जमा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव नगरपंचायतीच्या वतीने दि१२ मार्च रोजी प्लास्टिक पन्नी हटाव मोहीम राबवण्यात आली असून यावेळी गावातील व्यापाराच्या दुकानाची पाहणी करून प्लास्टिक पन्नी नगरपंचायतीच्या पथकाने जमा केली आहे यावेळी सेनगाव नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी गणेश गांजरे स्वच्छता निरीक्षक विनायक पडोळे लिपिक जगन्नाथ दिनकर कैलास बिडकर यांनी शहरातील दुकानांमध्ये जाऊन प्लास्टिक पन्नी खटाव मोहीम राबवत प्लास्टिक पन्नी नगरपंचायतीला जमा केली आहे.



भूमी अभिलेख सिंदखेड राजा येथे कार्यरत असलेले मित्रवर्य प्रकाश शिंदे यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी समलेले पत्रकार बांधव व सहकारी (छाया :– लोकनेता न्युज नेटवर्क सिंदखेड राजा)

# सोनाबाई कांबळे यांचे निधन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । प्रतिनीधी**

कंधार तालुक्यातील शेकापुर येथील जेष्ठ महिला नागरिक सोनाबाई दरशथ कांबळे (वय ८९) यांचे बुधवारी, दि.१२ मार्च रोजी दुपारी ३.४५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली,जावई,सूना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आज गुरुवारी, दि.१३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता कंधार येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.अंकुर युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदिप कांबळे पांगरेकर यांच्या त्या आई आहेत,



सिंदखेड राजा येथे मा. प्रकाश शिंदे साहेब यांना जन्मदिनानिमित्त भेटून शुभेच्छा देतांना, दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत व संपादक राहुल झोटे (छाया :– लोकनेता न्युज नेटवर्क सिंदखेड राजा)


# इश्वरचंद्र विद्यासागर/राजा राममोहन रॉय वॉर्ड २०२५ डॉ.विजयकुमार कस्तुरे,ॲडव्होकेट,चिखली यांना जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोलकाता । ज्ञानेश्वर बुधवत**

आपल्या संवैधानिक, सामाजिक, साहित्यिक व मानवीय सेवाभावी कार्यास्तव महाराष्ट्रंच नव्हे तर देशाच्या अनेक राज्यात तसेच अंतर्राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करणारे व सर्वांना सुपरिचित असलेले डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली यांना राममोहन विद्यासागर ॲकेडमी, वेस्ट बेंगाल, इंडिया च्या तर्फे ' इश्वरचंद्र विद्यासागर / राजा राममोहन रॉय ' हा बहुमानाचा पुरस्कार दि. ०४–०३–२०२५ रोजी जाहीर झाला असून तसे सन्मान पत्र तथा सदर पुरस्कार दि. २३–०३–२०२५ रोजी कोलकाता येथे आयोजित समारंभात प्रदान होणार असल्याने तो स्विकारण्यासाठी सदर सोहळ्याचे निमंत्रण पत्र, त्यांना आदरपूर्वक देण्यात आले आहे.

त्याच बरोबर संस्थेच्या वतीने आयोजित नॅशनल पोयेट फेस्टिवल मधे प्रमुख अतिथी या नात्याने निमंत्रित सुध्दा करण्यात आले आहे. ड. कस्तुरे हे मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी भाषेतील साहित्यिक क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण लेखन, काव्य, शाहीरी, गीत, शायरी, गायन, अभिनय, दिग्दर्शन, कथा, पथनाट्य, वक्तृत्व इत्यादी साठी देशातील अनेक राज्यात प्रसिद्ध असून अंतर्राष्ट्रीय स्तरावरील साहित्यिक संमेलनात विविध पुरस्कारांनी सन्मानित तथा सामाजिक कार्यासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे त्यांना मानद डॉक्टरेट सुध्दा प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच विविध सामाजिक व साहित्यिक तथा सांस्कृतिक संस्था, मंडळे, विधायक संघटना आणि केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली, संविधान सन्मान परिषद, महाराष्ट्र, बहुजन साहित्य संघ, चिखली, संस्कार भारती अशा अनेक पातळींवर गेली अनेक दशके कार्यरत असून त्यांचे सर्व नागरिकांच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.



# हरभऱ्याच्या दरावर संकट! पिवळ्या वाटाण्याच्या आयातीला मुदतवाढ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

हरभरा उत्पादकांना अडचणीत आणणाऱ्या पिवळा वाटाण्याच्या मुक्त आयातीला केंद्र सरकारने ३ महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. या काळात आणखी ४ ते ५ लाख टन पिवळा वाटाणा आयात होऊ शकते, असा अंदाज आहे. त्यामुळे बाजारात आता शेतकऱ्यांच्या हरभऱ्याची आवक आणि पिवळा वाटाणा आयात यामुळे दबाव वाढण्याची शक्यता आहे. बाजारात आवकेचा दबाव असेपर्यंत हरभरा हमीभावापेक्षा कमी दरात विकला जाऊ शकतो, असा अंदाजही अभ्यासकांनी व्यक्त केला.

केंद्र सरकारने पिवळा वाटाण्याची मुक्त आयातीला ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगाने याविषयी अधिसूचना काढली आहे. म्हणजेच पिवळा वाटाणा आयातीवर कोणत्याही प्रकारचे किमान आयात मूल्य किंवा आयात शुल्क लागणार नाही. तसेच आयात कोटाही नसेल. मात्र आयात करताना इम्पोर्ट मॉनिटरिंग सिस्टमवर त्याची नोंद करावी लागेल. ३१ मे २०२५ पर्यंत आयातीसाठी जहाजांमध्ये माल भरलेल्या मालाची आयात मुक्त असेल, असे अधिसूचनेत म्हटले आहे. वाटाण्याची मुक्त आयात यापूर्वी २८ फेब्रुवारीपर्यंत होती. आता मुदतवाढ मिळाल्याने आयातदारांना जवळपास ३ महिने मुक्त आयात करता येईल.

मागील वर्षभर वाटाण्याच्या मुक्त आयातीमुळे हरभरा आणि तुरीचे भाव कमी होण्यास मदत झाली. हरभऱ्याचा भाव मोठ्या प्रमाणात तुटला होता. आता तर हरभऱ्याचे भाव हमीभावाच्या खाली आले आहेत. तूरही हमीभावाच्या खाली विकली जात आहे. त्यामुळे सरकारने पिवळा वाटाणा, उडीद आणि तुरीची मुक्त आयात बंद करावी, अशी मागणी शेतकरी आणि उद्योगांकडूनही केली जात होती. कारण त्याशिवाय देशातील शेतकऱ्यांना दर मिळणार नाही आणि उत्पादनही वाढणार नाही. सरकारच्या धोरणामुळे केवळ शेतकरीच नाही तर व्यापारी आणि प्रक्रिया उद्योगही अडचणीत आले आहेत.



**पिवळा वाटाणा आयात वाढणार :** दिल्ली येथील आयग्रेन इंडियाचे संचालक आणि बाजार विश्लेषक राहुल चौहान यांनी सांगितले, की आयातीला मुदतवाढ मिळाल्याने ३१ मेपर्यंत आणखी ४ ते ५ लाख टन पिवळा वाटाणा आयात होऊ शकते. भारताला कॅनडातून मोठ्या प्रमाणात आयात होईल. तसेच रशिया, टर्की, युक्रेन, लिथुआनिया, लॅटविया आदी देशांमधूनही आयात होऊ शकते.

**चीनकडून कॅनडाच्या वाटाण्यावर १०० टक्के शुल्क :** चीनने नुकतेच कॅनडामधून आयात होणाऱ्या पिवळा वाटाण्यावर १०० टक्के आयात शुल्क लावले आहे. त्यामुळे कॅनडाचा चीनकडे जाणारा पिवळा वाटणा भारतात येऊ शकतो. कारण नेमके याच काळात भारताने मुदतवाढ दिली आहे. तसेच कॅनडा पिवळा वाटाण्याचा आघाडीचा निर्यातदार आहे. शेजारच्या चीनमध्ये १०० टक्के शुल्क आणि भारतात कोणतेही शुल्क नाही त्यामुळे चीनला जाणारा माल भारतात येईल, असे अभ्यासकांनी सांगितले.

**हरभऱ्यावर दबाव :** पिवळा वाटाणा हरभऱ्याला पर्याय म्हणून मोठ्या प्रमाणात वापरला जातो. त्यामुळे हरभऱ्याचे भाव पडले आहेत. त्यातच आता शेतकऱ्यांचा माल बाजारात येत आहे. आवकेचा दबाव वाढत आहे. आता त्यातच पिवळा वाटाणाही आयात होणार आहे. म्हणजेच हरभरा बाजारावर आता शेतकऱ्यांच्या मालाची आवक आणि पिवळा वाटाण्याची आयात याचा दबाव असणार आहे. हरभऱ्याला सरकारने यंदा ५ हजार ६५० रुपये हमीभाव जाहीर केला. आयातीमुळे आवकेचा दबाव असेपर्यंत बाजार हमीभावाच्या खालीच राहू शकतो, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.

**उडीद आयातीला एक वर्षाची मुदतवाढ :** केंद्र सरकारने उडदाच्या मुक्त आयतीला एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत भारतात कोणत्याही बंधनाशिवाय उडीद आयात होणार आहे. मुक्त आयातीची मुदत ३१ मार्च २०२५ पर्यंत असताना सरकारने मुदतवाढ दिली आहे. उडदाचे भाव आधीच कमी आहेत. उडदाला यंदा ७ हजार ४०० रुपये हमीभाव सरकारने जाहीर केला. तर बाजारात ६ हजार ते ६ हजार ५०० रुपयांच्या दरम्यान उडदाला भाव मिळत आहे.

सरकारने मसूर आयातीवर १० टक्के शुल्क लावून मसूर उत्पादकांना काहीसा दिलासा दिला. मात्र पिवळा वाटाण्याच्या मुक्त आयातीला ३१ मेपर्यंत मुदतवाढ दिली. हा निर्णय हरभरा बाजारावर परिणाम करणारा आहे. डिसेंबर २०२३ ते जानेवारी २०२५ दरम्यान भारताने ३२ लाख टन पिवळा वाटाणा आयात केला. स्वस्त पिवळा वाटाण्याचा वापर वाढल्याने इतर कडधान्याचे भाव हमीभावाच्या खाली आले आहेत. एकीकडे सरकार कडधान्यामध्ये आत्मनिर्भर होण्याचे उद्दिष्ट ठेवते आणि दुसरीकडे मुक्त आयात करत आहे.

# महिला दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन व खरी कमाई कार्यक्रमाचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कासार शिरशी । अफरोज जागीरदार**



निलंगा तालुक्यातील कासार सिरसी येथे सनशाईन इंग्लिश मेडियम स्कूल,कोराळी वाडी रोड,कासार शिरसी येथे दि.०८/०३/२०२५ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन व खरी कमाई या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले,या कार्यक्रमानिमित्त डॉ.प्रियंका भगत मॅडम (वैद्यकीय अधिकारी) ग्रामीण रुग्णालय कासार शिरशी,डॉ.श्री.बालाजी सावंत सर (वैद्यकीय अधिकारी) ग्रामीण रुग्णालय कासार शिरशी व श्री.उमाकांत पाटील सर (औषध व्यापारी) कासार शिरशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.प्रमुख अतिथी यांचे स्वागत संस्थेचे (अध्यक्ष) श्री.महेश व्हनाळे सर,संस्थेचे (सचिव) सौ.सुनीता व्हनाळे मॅडम, संस्थेचे (सहसचिव) सौ.शोभा कोराळे मॅडम व शाळेच्या (मुख्याध्यापिका) सौ.प्रतिभा पाटील मॅडम यांनी केले.

या कार्यक्रमांमध्ये मुलांनी बरेच वैज्ञानिक प्रयोगाचे आयोजन करून पालकांचे मने आकर्षित केले व तसेच खरी कमाई या कार्यक्रमांमध्ये मुलांनी विविध प्रकारचे दुकाने मांडून कार्यक्रमाला अत्यंत सुंदर असे रूप आणले, कार्यक्रमासाठी पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती दिसून आली.या कार्यक्रमासाठी सूत्रसंचालन कु.सुष्मा मेलगिरे मॅडम यांनी केले व तसेच कार्यक्रमासाठी श्री.दीपक धायगुडे सर सौ.ज्योती जगताप मॅडम,सौ.शोभा धुमाळ मॅडम,कु.बीजान कोळसूरे मॅडम,सौ.सुमित्रा जगदाळे मॅडम कु.साक्षी पाटील मॅडम,सौ.दिपाली सूर्यवंशी,श्री.अनिल बिराजदार,श्री.दत्ता बिराजदार,व श्री.श्याम ममाळे आदींनी योगदान दिले.

# भिगवण येथील स्मशानभूमीसाठी २० लाख रुपयांचा निधी–अजिंक्य माडगे

## जिल्हा नियोजन मधून मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला निधी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धातोंडे**



भिगवण येथील वैकुंठ स्मशानभूमीत नागरिकांना बसण्यासाठी आवश्यक असणाऱ्या शेडचे भूमिपूजन सरपंच गुराप्पा पवार यांच्या उपस्थितीत करण्यात आला .कॅबिनेट मंत्री दतात्रय भरणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून २० लाख रुपयाचा निधी मंजूर झाल्याची माहिती राष्ट्रवादीचे अजिंक्य माडगे यांनी सांगितले.

भिगवण वैकुंठ स्मशानभूमीत नागरिकांना बसण्यासाठी शेडची व्यवस्था होती मात्र सुशोभीकरण करताना आणि स्मशानभूमीची उंची वाढविण्याच्या हेतूने तत्कालीन सरपंच तानाजी वायसे यांच्या कार्यकाळात हे शेड काढण्यात आले होते.मात्र शेड काढल्याने अंत्यविधीसाठी आलेल्या नागरिकांना बसण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता.ग्रामस्थ आणि कार्यकर्ते यांनी याबाबत मंत्री दतात्रय भरणे यांच्याकडे मागणी केली होती.याच मागणीची तातडीने दखल घेत मंत्री भरणे यांनी जिल्हा नियोजन समितीतून २० लाख रुपयाचा निधी मंजूर केला.या शेडचे भूमिपूजन आज करण्यात आले.यावेळी सरपंच गुराप्पा पवार उपसरपंच सत्यवान भोसले ,बाजार समिती उपसभापती पराग जाधव ,पंचायत समितीचे माजी उपसभापती संजय देहाडे ,माजी सरपंच तानाजी वायसे ,दत्ता धवडे ,माजी उपसरपंच प्रदीप वाकसे ,अजिंक्य माडगे ,अशोक शिंदे ,जावेद शेख ,तुषार क्षीरसागर ,सचिन बोगावत,बापूराव थोरात ,संदीप वाकसे,मोहन शेंडगे ,वैभव देवकाते,रोहित भरणे ,अमोल देवकाते , शुभम शेलार ,आप्पासाहेब गायकवाड ,रोहित शेलार ,विक्रम देवकाते ,निखील बोगावत ,अमोल वाघ ,आकाश उंडाळे ,दत्तात्रय पाचांगने ,आण्णासाहेब धवडे ,अनिल तांबे ,सुरेश बिबे ,दिनानाथ मारणे,भाऊसाहेब भरणे ,संदीप शेलार उपस्थित होते.

# ब्ल्यु बर्डस टेक्नो स्कूलच्या चिमुकल्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून देशभक्तीचे घडविले दर्शन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**



दरवर्षी प्रमाणे याही वर्षीही मौजे गडगा येथील ब्ल्यु बर्डस टेक्नो स्कूलमध्ये दि.६ मार्च रोजी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेतील चिमुकल्यांनी वेगवेगळ्या गीतावर बहारदार असे नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. सदर कार्यक्रमास प्रेक्षकांची मोठी गर्दी होती . नरसी येथील नंदेश्र्वर कोरे व पुजा कोरे या दांपत्याकडून गडगा येथे इंग्रजी शाळा सुरू करण्यात आली .गेल्या बारा वर्षां पुर्वी सुरू झालेल्या या शाळेत गडगा, नरसी होटाळा, नावंदी ,मरवाळी ,कोपरा , मोकासदरा , मांजरम आदी गावातील ३८० विद्यार्थ्यां शिक्षण घेत असुन येथे शिक्षण घेत असेलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षक दर्जेदार शिक्षण देत असल्याने ही शाळा कमी कालावधीत नावारूपास आली आहे.

६ मार्च रोजी झालेल्या सांस्कृतिक कला महोत्सवाचे उद्घाटन सौ.मंगल अशोक जोगदंड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. व्यासपिठावर प्रमुख पाहुने म्हणून डॉ.उमाताई नीलम पाटील , डॉ.यशोदा सोनवणकर, सहशिक्षक संगीता शिवशंकर कोरे,सरपंच लक्ष्मीबाई पवळे , मु.अं.अश्विनी गोपाळराव हडपकर,गीता गणपत सलगरे व शाळेच्या मु.अ.पुजा नंदेश्र्वर कोरे आदीची उपस्थित होते.

यावेळी शाळेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला . यावेळी शाळेतील चिमुकल्यांनी स्वागत गीत,श्री गणेशा वंदन गीत,देशभक्तीपर गीत,आर्मि सांग, लावणी हिंदी, तेलुगु मराठी आदी गीतासह गोंधळ, आदी लोकगीतावर दर्जेदार नृत्य सादर करून विद्यार्थ्यांनी प्रक्षेकांची मने जिंकली . यावेळी देविदास पवळे , सुहास पा. टाकळीकर पो.पा.भांगे , मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष लक्ष्मण बरगे,प्रा.शिवशंकर कोरे , रावसाहेब पा.शिदे आदीची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शाळेचे मुख्याध्यापक पुजा कोरे यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नदेश्र्वर कोरे व सहभागी सर्व विद्यार्थी शाळेचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले आहे.

# सौ.कोमलताई सुकेशजी झंवर यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.अनाथ मुलांच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना खाऊ वाटप



लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

सामाजिक व बॅकिंग क्षेत्रात सदा अग्रेसर असणारी बुलडाणा अर्बन को –ऑफ सोसायटी लिमिटेड बुलढाणा शाखा लोहाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जोपासत कोमलताई सुकेशजी झंवर – अध्यक्षा सहकार विद्या मंदिर ग्रुप ऑफ स्कूल तथा अध्यक्षा बुलढाणा अर्बन चॉरिटेबल ट्रस्ट यांच्या वाढदिवसानिमित्त लोहा शहरातील जि.प. अनाथ मुलांच्या वसतिगृहात बुलडाणा अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष भाई राधेश्याम चांडक, संस्थेचे अध्यक्ष सुकेशजी झंवर यांची प्रेरणा घेऊन बुलढाणा अर्बन बँकेचे विभागीय व्यवस्थापक प्रफुल्ल संचेती यांच्या मार्गदर्शनाखाली केळी, बिस्किट पुडे आदी खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी बुलढाणा अर्बन बँक शाखा लोहा चे व्यवस्थापक केशवराव शेटे,एबीएम इंदल पवार, प्रविण कदम,किशोर गुरमेवार, अंकुश गिते, गजानन पेनूले, ऋषी खरात,घंटे मॅडम, वसतीगृहाचे अधीक्षक शेख सर, यांच्यासहित पत्रकार बांधव आदी उपस्थित होते.

# अमन का रोजा और खुशियालि का रमजान

लोकनेता न्यूज नेटवर्क

सारे जहाँ से अच्छा , हिंदोस्ता हमारा हे वाक्य म्हणताना, ऐकताना अंगावर शहारे येतात. मान गर्वाने उंचावते, डोळ्यात तेजस्वीपण येतो. हृदय स्फुरणाने जागे होते . चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारे पहिले भारतीय अंतराळवीर राकेश शर्मा यांना तत्कालीन महिला पंतप्रधान इंदिरा गांधींनी प्रश्न विचारला होता, 'राकेशची चांद के उपर से अपना भारत कैसे दिखता है? तर त्यांनी दिलेले हे समर्पक उत्तर , सारे जहाँ से अच्छा , हिंदोस्ता हमारा याचे कारणही तसेच आहे , भारत हा विविधतेने नटलेला देश आहे . व्यक्ती, समाज, धर्म, पंथ , जाती, प्राकृतिक रचना, भाषा, जमीन, हवा, पाणी इ. अनेक बाबतीत भारतात विविधता आढळते. धर्माच्या बाबतीत सांगायचं झालं तर भारतात अनेक धर्म आहेत तरीही जगात भारत हा धर्मनिरपेक्ष देश म्हणून गणला जातो. मजहब नही सिखाता आपस मे बैर रखना! कोणताही धर्म वाईट शिकवन कधीच देत नसतो. खरंतर या धर्म या शब्दाचा अर्थच कर्तव्य असा आहे. सध्या इस्लाम धर्मामध्ये रमजानचा पवित्र महिना चालू आहे . इस्लाम या शब्दाचा अर्थ आहे 'अमन'अर्थात 'शांती '. इस्लामिक कॅलेंडर मध्ये बारा महिने आहेत ते लूनार कॅलेंडर प्रमाणे म्हणजे (चंद्रवर्ष ) दिनदर्शिका प्रमाणे चालते. रमजान म्हणजे 'बरकती ' आणि ईद म्हणजे 'आनंद '. मनामनातील दरी कमी करून परस्परांमध्ये स्नेहभाव वाढवणारा हा महिना . याच महिन्यात हजरत मोहम्मद पैगंबरांना त्यांच्या अखंड साधनेचे , खडतर तपश्चर्याचे फळ मिळाले अर्थात त्यामुळेच त्यांना अल्लाहचे दर्शन झाले . मोहम्मद पैगंबर हे इस्लाम धर्माच्या संस्थापक होते . इस्लामच्या धारणेनुसार अल्लाह ने त्यांच्या मार्फत कुराण हा पवित्र धर्मग्रंथ लोकांपर्यंत पोहोचविला असे सांगितले जाते. म्हणूनच त्यांना 'पैगाम देनेवाला' अर्थात पैगंबर म्हणजेच प्रेषित असे म्हणतात. अशा या पवित्र कुराणची निर्मिती रमजान महिन्यात झाली . म्हणून या महिन्यास विशेष असे स्थान आहे. रमजान महिना म्हणजे प्रार्थना आणि रोजा म्हणजेच (उपवास) करण्याचा महिना . अगदी लहान बालकापासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वजण रोजाचा उपवास करतात. अतिशय खडतर असा उपवास, दिवसभर



पाणीच काय पण तोंडातली लाळ सुद्धा गिळता येत नाही. किती हा संयम . गौतम बुद्धांनी आपल्या पंचशील तत्त्वात, वर्धमान महावीरांनी आपल्या पंच महावृतात तर वैदिक धर्मामध्ये अनेक आचार्य ऋषीमुनींनी देखील इंद्रियावरील तसेच लोभ, अपेक्षा, मोह इ. वरील संयमाबद्दल बरेच काही सांगितले आहे . याचाच अर्थासाठी प्रत्येक धर्मात समानता आहे आणि प्रत्येक धर्म चांगलीच शिकवण देत असतो. रमजानच्या रोजा मागेही शास्त्रीय कारणे आहेत . धर्माला जेव्हा शास्त्राची जोड असते तेव्हा ते योग्यतेच्या कसोटीवर उतरत असतात. आपण या समाजाचा एक घटक आहोत, समाजाप्रती आपणही काही देणे लागतो हा सुहेतू मनात ठेऊन दानधर्म केला जातो. आपल्या उत्पन्नाच्या २:५ (दोन पंचमांश) हिस्सा समाजाच्या कल्याणासाठी, गोरगरिबांसाठी द्यावा असे कुराणमध्ये स्पष्ट लिहिले आहे. सर्व मतभेद विसरून , एकमेकांना सोबत घेऊन चालण्याचा पैगाम घेऊन हा रमजान येत असतो. चला तर मग आपणही या रमजानच्या पवित्र महिन्यात सामील होऊ या शांती, संयम आणि प्रेमाचा संदेश सगळ्या जगाला देऊया.........!

**–लक्ष्मी विठ्ठलराव पांडागळे (नांदेडे) सहशिक्षिका**
**अशोक प्राथमिक व माध्यमिक विद्यालय ,विष्णुनगर**
**नांदेड.मो.न.९६९९९६००८१**

## सद्या मुस्लिम समाजाचे पवित्र महिना रमजान सुरू आहे

# दानापूर सहपरिसरात मस्जिद मध्ये दररोज रोजा इफ्तार केल्या जाते

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

या वर्षी रमजान २ मार्च पासून सुरू झाला असून रोजाबरोबरच नमाज, कुराण पठण, विशेष प्रार्थना आदींमार्फत परमेश्वराची इबादत केली जाते. मुस्लिम धर्मामध्ये चांगल्या व्यक्तीला उत्तमरीत्या परिभाषित करण्यात आले आहे. यासाठी मुस्लिम असणेच पुरेसे नाही तर मुलभूत पाच कर्तव्यांचे पालन करणे आवश्यक आहे. पहिले इमान (प्रामाणिकपणा) दुसरे नमाज, तिसरे रोजा, चौथे हज आणि पाचवे जकात. इस्लाममध्ये सांगण्यात आलेले हे पाच कर्तव्य इस्लाम मानणाऱ्या व्यक्तीकडून प्रेम, सहानुभूती, मदत आणि आपलेपणाची इच्छा बाळगतात.

**रोजाचा मूळ उद्देश** –रमजानमध्ये रोजा या शब्दाला आरबी भाषेत सोम म्हणतात, याचा अर्थ थांबणे. रमजानच्या पवित्र महिन्यात सर्व दिवस 'रोजा' (उपवास) करणारे सर्व 'रोजेदार' दिवसभर अन्नपाणी घेत नाहीत. यासाठी शारीरिक आणि मानसिक संयमाची फार आवश्यकता असते. त्यामुळे आपल्या इंद्रियांना आणि मनाला एक शुचिभरूत वळण लाभतं. मन एकाग्र करायला सुद्धा याचा फार उपयोग होतो. त्याचप्रमाणे ' इबादत' (उपासना) करण्यासाठीसुद्धा योग्य पार्श्वभूमी व मानसिकता निर्माण होते. संपूर्ण रमजान महिना हा जणू उपासनामय, प्रार्थनामय आणि भक्तिमय झालेला असतो.

'रमजान' मांगल्याचे प्रतिक आहे. त्यामुळे याला कृपाप्रसादाचा महिनाही म्हणतात. पवित्र कुराणाचे अवतरण याच महिन्यातील एका रात्री झाल्याने ही रात्र हजार रात्रींपेक्षा वरचढ ठरली आहे. रमजान मध्ये रोजे अनिवार्य आहेत. या रात्रीत जादा नमाज अदा करणे म्हणजे अल्लाहच्या समीप जाणे होय. नफील नमाजचा (जादा नमाज) मोबदला फर्ज (अनिवार्य नमाज) इतका दिला जातो तर फर्ज (अनिवार्य) नमाजचा मोबदला सत्तर पटीने जास्त असतो.



**रमजान महिन्याचे तीन हिस्से** –रमजान इस्लामी दिनदर्शिकेनुसार नववा महिना असतो. रमजान महिन्याचा पहिला दशक 'कृपेचा', दुसरा दशक 'क्षमेचा', तिसरा आणि अंतिम दशक नरकापासून 'मुक्ततेचा' मानला जातो. या काळात अल्लाह त्यास क्षमादान देईल व नरकापासून सुटका करून मुक्ती देईल. त्यामुळे वर्षभरातील अन्य अकरा महिन्यांत मिळणार्या नेकी (पुण्याई) पेक्षा रमजानमध्ये मिळणारी नेकी ही ही तब्बल सत्तर पटीने जास्त असते. त्यामुळे मुस्लिम बांधव जास्तीतजास्त नेकी कमाविण्यासाठी पवित्र रमजान महिन्यात संसार, व्यापार आदींचा त्याग करून अल्लाहस शरण जातात.

**का साजरी केली जाते रमजान ईद** –रमजान म्हणजे बरकती आणि ईद म्हणजे आनंद. परस्परांमध्ये स्नेहभाव वाढविणारा हा महिना. रमजान ईद या दिवसाला ईद उल फित्र असेही म्हणतात. हा महिना व हा दिवस मुस्लिम धर्मियांसाठी अत्यंत पवित्र व मंगलमय असा मानला जातो. इस्लामिक दिनदर्शिकेनुसार मुस्लिम बांधव रमजानच्या महिन्यात २९-३० दिवसांचा रोजा ठेवतात. त्यानंतर शव्वालच्या पहिल्या तारखेला ईद-उल-फित्र म्हणजे ईद ही चंद्रदर्शनाने साजरी केली जाते. मुस्लिम बांधव महिनाभराचे उपवास करण्याची ताकद दिल्याबद्दल अल्लाहचे आभार मानतात. रमजानमध्ये जकात म्हणून गरिबांना मदत केली जाते व दानधर्म केला जातो.

**पुण्य कमवा व पाप जाळा** – रमजानचा मुख्य संदेश पुण्य (दुवा) कमवा आणि पाप जाळा असा आहे. मुस्लिम या शब्दाचा अर्थ अल्लाच्या आज्ञांचे पालन करणारा किंवा शांततेचे रक्षण करणारा असा केला जातो. रमजान महिन्यात दिवसा व रात्रीच्या वेळा नमाज अदा केली जाते. सलग ३० दिवस रोजा (उपवास) केला जातो. हा रोजा १२ तासांचा असतो. सुर्योदयापासून अन्न पाणी वर्ज्य केले जाते. रमजान महिन्यात पहिले १० दिवस ईश्वरी कृपेचे, पुढील १० दिवस भक्तीचे व शेवटचे १० दिवस रोजेदारांचे रक्षण करण्यासाठी असतात. रमजानचा मुख्य संदेश आनंदी रहा असाच आहे.

# युवा नेते महादेव दरेकरांकडून शाळेसाठी एक टिव्ही संच भेट

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

वांगदरी (ता.श्रीगोंदा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंदी बाजार या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आनंदी बाजाराचा अनुभव घेतला. या वेळी विद्यार्थी विक्रेते, पालक, शिक्षक व अन्य विद्यार्थी ग्राहक बनल्याचे सुखद चित्र पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांनी विविध वस्तू, भाजीपाला, फळे व खाऊच्या विक्रीतून व्यवसायाचा अनुभव घेतला.

आनंदी बाजाराचे उद्घाटन सरपंच संजय काका नागवडे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हनुमंत हराळ व पोलिस पाटील सुभाषराव गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान, गणितीय संकल्पना लक्षात याव्यात, यासाठी अनोखा अनुभव देण्याचा प्रयत्न या उपक्रमांतून करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची छोटी दुकाने शाळेच्या प्रांगणात थाटली होती. वस्तू घेण्यासाठी पालकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी महादेव दरेकर यांनी माहिती तंत्रज्ञानाच्या अध्ययन अध्यापनात उपयोग करण्यासाठी टीव्ही युनिट संच सप्रेम भेट म्हणून दिला. यावेळी युवा नेते विर गोरे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले.. !!



हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पालकांनी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. वडापाव,नुडल्स, भेळ, पाणीपुरी,इडली, सांबर, मोमोज, पोहे, भजीपाव, केक, गोळ्या, बिस्किटे, कुरकुरे, लस्सी, आइस्क्रीम,नारळपाणी,कलिंगड, अशा अनेक पदार्थांचा मनमुराद आनंद घेतला.

या वेळी युवा नेते विर गोरे, इंद्रभान नलगे, हनुमंत काटे, विनोद घाडगे, सचिन नागवडे, माजी सरपंच भडांगे, दत्ता नागवडे आदी उपस्थित होते. आनंदी बाजारात मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. आजच्या काळात इंग्लिश मीडियम मराठी मिडीयम खाजगी शाळेमध्ये घालण्याचा लोकांचा कल आहे. पण या शाळेमध्ये पहिली ते चौथीपर्यंत एकूण ९१ विद्यार्थी आहेत याचे सर्व श्रेय आबासाहेब जगताप सर,मुख्याध्यापक वनिता नलगे मॅडम, रोहिणी शिर्के मॅडम, रजनी गोरे मॅडम, अनिता शिंदे मॅडम या सर्व शिक्षिकांना दिले जात असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. मुख्याध्यापक वनिता नलगे मॅडम यांनी सूत्रसंचालन केले. रोहिणी शिर्के मॅडम यांनी आभार व्यक्त केले.

# यमराज चौक मृत्यूच्या सापळ्यात आपले स्वागत आहे; चंदननगर बीआरटी समोर अनोखे आंदोलन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

नगर रोड चंदन नगर मधील धोकादायक बीआरटी मुळे अनेक अपघात घडून कित्येकांचा मृत्यू झाला आहे. हा बीआरटी काढण्यासाठी कित्येक वेळा प्रशासनाला धारेवर धरण्यासाठी वेगवेगळे प्रयोग करण्यात आले मात्र पुणे महानगरपालिका झोपेचे सोंग घेवून बघ्याची भुमिका घेत असल्याचे चित्र दिसत आहे.

धोकादायक बीआरटी काढून टाकण्यात यावा यासाठी अनोखे आंदोलन करण्यात आले त्या आंदोलनात धोकादायक ठिकाणाचे नाव यमराज चौकअसे नामकरण करण्यात आले आहे. यमराजाच्या वेशभूषेत येऊन स्वतः यमराजानेच नामकरण केले असे चित्र दाखवण्यात आले. भविष्यात होणाऱ्या अपघातावर नियंत्रण व आळा घालता येईल व महानगर पालिकेने तात्काळ कारवाई करण्यात यावी यासाठी हे आंदोलन शिरूर तालुका मित्रपरिवार पुणे चे संस्थापक अध्यक्ष श्री.बाळा रमेश पऱ्हाड यांच्या संकल्पनेतून श्री किरण सांगळे, यमराजाच्या वेशभूषेत कु.कृष्णा राजेश पऱ्हाड,कल्याणी बाळा पऱ्हाड ,युवराज पाचपुते हे सर्व सहकारी उपस्थित होते.




# मा.ना.अजित पवार उपमुख्यमंत्री साहेब आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांना मंत्रिपद द्या-गंगाधर पाटील घोरबांड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । संतोष पा.जाधव**

लोहा कंधार विधानसभा निवडणुकीमध्ये मा.ना.अजीतदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे दुरदृष्टी असलेले अनुभवी आमदार म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला सुपरिचित आहेत .आ. प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांना मंत्रिपद देऊन त्यांचा मंत्रीमंडळात समावेश करावा असी मागणी कलंबर सर्कलचे सामाजिक कार्यकर्ते तथा कलंबर खुर्द येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे कट्टर समर्थकांनी मा.ना.अजीतदादा पवार साहेब यांच्या कडे केली आहे. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे अनुभवी व दुरदृष्टी असलेले नेते आहेत. तीनवेळा आमदार तर एकवेळ खासदार म्हणून काम केलेले आहेत. महायुतीच्या काळात नांदेड जिल्ह्यात विविध विकास कामे मंजूर करून घेतले आहेत.



नांदेड जिल्ह्यात नऊ जागेवर महायुतीचे आमदार असून यामध्ये पाच भाजपचे, शिवसेना (शिंदे) गटाचे तीन तर राष्ट्रवादी (अजीत दादा पवार) गटाचे चिखलीकर हे एकमेव दमदार आमदार निवडून आले आहेत. मागील दोन दशकांतील वेगवेगळ्या कालखंडात दोन वेळा आमदार झालेले चिखलीकर पुन्हा एकदा लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील मतदारानी प्रचंड मताधिक्य देऊन तिसऱ्यांदा निवडून दिले आहे. २० वर्षाच्या अनुभवाच्या जोरावर मंत्रीमंडळ विस्तारा दरम्यान आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नावाची घोषणा करण्यात यावी.कारणआ.प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब सर्वांना सोबत घेऊन काम करणारे कर्तव्यदक्ष आमदार आहेत तसेच अनुभव असल्यामुळे मंत्रीमंडळात संधी देण्याची मागणी कलंबर खुर्द येथील सामाजिक कार्यकर्ते गंगाधर पाटील घोरबांड यांनी केली आहे.

# ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यी बदली करा-शिष्टमंडळाची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनिल शिंदे**

ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यी तात्काळ बदली करण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाचे दक्षिण तालुका प्रमुख उध्दव पाटील शिंदे व जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी मुंबई येथे मंत्रालय येथे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, शिवसेना उपनेते आमदार हेमंत पाटील व नांदेड दक्षिण आमदार आनंदराव पाटील



बोढारकर यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे. ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्या बदली विषयी मंत्रालय येथे शिवसेना नेते एकनाथ भाई शिंदे तसेच शिवसेना उपनेते हेमंत भाऊ पाटील तसेच नांदेड दक्षिणचे आ.आनंदरावजी पाटील बोढारकर यांच्या कडे ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांची तात्काळ बदली करण्यात यावी म्हणून निवेदन दिले,यावेळेस माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे शिवसेना दक्षिण तालुका प्रमुख उद्धवराव पाटील शिंदे व तंटामुक्ती अध्यक्ष रमेश वाघमारे , जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, शंकरराव शिंदे ,प्रभाकर गायकवाड यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना निवेदन देऊन पोलीस निरीक्षक यांची तात्काळ बदली करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

# कांतीलाल गिरे यांचे नऊ दिवसांपासून आमरण उपोषण सुरू असून त्यांच्या मागण्यांकडे प्रशासनाने अद्याप लक्ष दिलेले नाही




लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील निमगावचोभा येथील सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल मोहन गिर्हे यांनी महाराष्ट्र राज्यातील जमीन पुनर मोजणी, शिवरस्ते व गावठाण मोजणी संदर्भात ३ मार्च २०२५ रोजी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.या मुद्द्यावर त्यांनी ५ जानेवारी २०२४ रोजी माननीय जमाबंदी आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांना निवेदन दिले होते. यावेळी कोणतीही कारवाई झाली नसल्यामुळे, त्यांनी १ ऑगस्ट २०२४ रोजी श्रीराम मंदिर चोभा निमगाव येथे उपोषण सुरू केले होते. त्यावेळी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय बीड व पाटोदा येथील अधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्याने त्यांनी तात्पुरते उपोषण सोडले होते.परंतु,अद्यापही अपेक्षित कार्यवाही न झाल्यामुळे,आता ते जमीन पुनर मोजणी आणि नकाशावरील रस्त्यांचे काम पूर्ण होईपर्यंत उपोषण सोडणार नाहीत, असे त्यांनी ठामपणे सांगितले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते वनामा महाविद्यालय दुतर्फा स्ट्रीट लाईट दुरूस्ती अंतीम टप्प्यात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनिल शिंदे**

गेल्या अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असलेली डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते वनामा महाविद्यालय सिडको दुतर्फा स्ट्रीट लाईट अखेर माजी नगरसेविका सौ वैजयंती गायकवाड व सामाजिक कार्यकर्ते भि.ना.गायकवाड यांनी सतत केलेल्या पाठपुराव्यामुळे दुरूस्ती काम अंतिम टप्प्यात आले असून येत्या काही दिवसांत स्ट्रीट लाईट चालू होणार आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते वनामा महाविद्यालय सिडको दुतर्फा स्ट्रीट लाईट सिमेंट काँक्रीटच्या रस्ता होत असल्याने बंद अवस्थेत असल्याने जाणाऱ्या येणाऱ्या नागरीकासह वाहनाधारकांना अंधारातून मार्गक्रमण करावे लागत असे तर पादचारी यांनाही अंधाराच्या साम्राज्य मुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते,या बाबत गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेली स्ट्रीट लाईट चालू करावी या बाबत आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांच्या कडे निवेदनाद्वारे मागणी करून विधुत अभियंता, सहाय्यक अभियंता सिडको क्षेत्रीय कार्यालय यांचा कडे प्रत्यक्ष भेट घेऊन दुरूस्ती साठी मागणी केली.अखेर या प्रकरणी आयुक्त यांनी स्ट्रीट लाईट संबंधाने दुरूस्ती साठी निधी तरतूद केल्यानंतर विद्युत विभागाच्या वतीने दुरूस्ती साठी केबल,व स्ट्रीट लाईट यासह अनेक साहित्य उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर दुतर्फा स्ट्रीट लाईट चालू करण्याचे काम सुरूवात झाले असून स्ट्रीट लाईट अंतीम टप्प्यात असून येत्या काही दिवसांत स्ट्रीट लाईट चालू होणार आहे. सतत केलेल्या पाठपुराव्यामुळे दुरूस्ती कामासाठी निधी मुळे हे काम अंतिम टप्प्यात आले आहे.





देगलूर तालुक्यातील मरखेल येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षप्रवेश सोहळ्यानिमित्त आ. प्रतापराव पाटील चिखलीकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांचा सत्कार करताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी प्रदेश सरचिटणीस गंगाधर भांगे (छाया - बाजीराव पाटील)

# महिलेची हरवलेली पर्स केली परत; महिला पत्रकारासह महिला पोलिसांची कामगिरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । प्रतिनिधी**

माहूर शहरातील आठवडी बाजारात शहरातील शासकीय विश्रामगृहात स्वयंपाकी म्हणून काम करणाऱ्या महिलेची पैसे व सोने असलेली पर्स बाजार करत असताना खाली पडल्याने ती महिला पत्रकार सौ सुरेखा तळणकर यांना मिळाली त्यांनी बाजार करण्यासाठी आलेल्या महिला पोलिसांना ही बाब सांगून त्या महिलेचा बाजारातच शोध घेऊन पर्स तिला परत केल्याल्याने महिला पत्रकारासह महिला पोलिसांचे अभिनंदन होत आहे.

माहूर दर सोमवारी मोठा आठवडी बाजार भरतो या बाजारात हजारोच्या संख्येने महिला पुरुष भाजीपाला व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी येत असतात यावेळी अनेकांचे पैसे पडणे पर्स हरवणे या सह इतर घटना घडत असतात गेल्या सोमवारी अशीच येथील विश्रामगृहावर स्वयंपाकी म्हणून काम करणारी महिला धनवंता ग्यानदास कुमरे ह्या बाजार करत असताना त्यांची पर्स एका दुकानाच्या बाहेर पडली ती पर्स महिला पत्रकार सौ सुरेखा तळणकर यांना दिसल्याने त्यांनी पर्स हातात घेऊन पर्स उघडून बघितली असता पर्स मध्ये महिलेचे आधार कार्ड होते त्यावरून बरीच शोधा शोध केली परंतु सदरील महिला मिळून आली नाही त्यामुळे बाजार करण्यासाठी आलेल्या महिला पोलीस शिपाई शिवनंदा जाधव आणि सपोऊपनी सुनील गायकवाड यांच्या पत्नी सौ कोमल गायकवाड यांना सदरील बाब सांगितल्याने त्यांनी पोउपनि शिवप्रकाश मुळे यांना सदरील घटनेची माहिती देऊन तिघींनी मिळून त्या महिलेचा बाजाराचा शोध घेतला त्या मिळून आल्याने त्यांना जागेवरच पर्स परत करून त्यांचे साहित्य व्यवस्थित आहे की नाही याची खात्री करायला लावली महिला पत्रकार सुरेखा तळणकर तसेच महिला पोलिसांनी सदरील महिलेची पर्स खात्री करून परत केल्याने सपोनिं शिवप्रकाश मुळे यांचे सह मान्यवरांनी महिला पत्रकार सुरेखा तळनकर यांचे सह महिला पोलीसांचे अभिनंदन केले आहे.



# मुक्रमाबाद शहर सीसीटीव्ही कॅमेरेच्या नजरेत

## सहायक पोलिस निरीक्षक भालचंद्र तिडके यांचा पुढाकार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

पोलिस ठाण्याचा विस्तार व कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यात अडचणीचा सामना करावा लागत होता. पण सहायक पोलिस निरीक्षक भालचंद्र तिडके यांच्या पुढाकारातून व लोकसहभागातून मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद शहरात सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.




> सीसीटीव्ही मुळे सीमावर्ती भागातून येणाऱ्या व्यक्तीवर तसेच शाळा परिसरात टवाळ खोरांवर ही नजर राहणार आहे. काही दिवसांत शहरातील सर्वच मंदिर व देवस्थानात सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहे यामुळे गुन्हेगारीवर मोठ्या प्रमाणात आळा बसणार आहे.
>
> –भालचंद्र तिडके, सपोनि मुक्रमाबाद

मुक्रमाबाद शहराचा वाढता विस्तार पाहता पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या कमी असून आहे त्या कर्मचाऱ्यावर खूप ताण आहे . त्यामुळे शहरात छोट्या मोठ्या चोऱ्यांचे काहीसे प्रमाण वाढले होते. तर शाळा व महाविद्यालये परिसरात रोड रोड रोमीवोंचा सुळसुळाट वाढल्यामुळे यावर आळा घालण्यासाठी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक भालचंद्र तिडके, यांनी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी होईल तेवढी व्यापारी, राजकीय पुढारी व इतर दानशूर व्यक्तीकडून लोकवर्गणी जमा केली. तसेच कमी पडलेले पैसे स्वतः देऊन शहरातील देगलुर रेणापूर या मुख्य महामार्गावर मुख्य बाजार पेठ, शाळा, महाविद्यालये परिसर, भवानी चौक, यासह इतर १३ ठिकाणी सी. सी. टीव्ही कॅमेरे बसविले.

# मौजे आंबुलगा ता.कंधार येथे शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढण्याचे मार्गदर्शन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आंबुलगा । सूर्यभान बिजलगावे**

कंधार तालुक्यातील मौजे आंबुलगा येथे केंद्र शासनाच्या आदेशानुसार अंमल बजावणीसाठी राज्य शासनामार्फत दि. ११/०३/२०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालय आंबुलगा येथे अग्रीस्टॉक कॅम्पचे आयोजन करण्यात आले असून शेतकऱ्यांना फार्मर आयडी संदर्भात शासनाकडून विविध योजनेच्या फायद्या विषयी माहिती देण्यात आली. व शासन स्तरावर पिकविमा, पि एम किसान योजना, अतिवृष्टी, दुष्काळ अनुदान कृषी विभागाच्या विविध योजने बाबत कृषी सहाय्यक आंबुलगा वाघमारे साहेब यांनी अतिशय चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले. त्यावेळी आंबुलगा सज्जाचे ग्राममहसूल अधिकारी बालाजीराव केंद्रे साहेब , ग्रामविकास अधिकारी नवघरे साहेब , गावातील शेतकरी संभाजी पा. टेंभुर्णे, मोहन तुळशिराम वडजे, विजय शिर्षे, से. स. सो. आंबुलगा चेअरमन बालाजी पा. गव्हाणे, कोंडीबा केंद्रे, दत्ता पा. तेलंग, आंबुलगा ग्रा.प. कार्यालयाचे कारकून सदबा देवकांबळे व ईतर मान्यवर प्रतिष्टीत नागरीक शेतकरी व महिला मोठ्या संखेने उपस्थित होते.

# १५ मार्च रोजी बिबिसी कँनलला पाणी न सोडल्यास जलसमाधी घेणार : भारतीताई लगड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

१५ मार्च रोजी बिबिसी कँनलला पाणी न सोडल्यास जलसमाधी घेणार असे त्रिदल महिला शक्ती आघाडीच्या महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षा भारतीताई लगड यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की,बि बि सी कॅनॉल मौजे गाडेवाडी (गाडेवाडी, शिंगाडेवाडी, खोमणेवस्ती साळुंके वस्ती ता.दौंड येथे पिण्यासाठी व शेतकऱ्यांच्या पिकांसाठी पाणी सोडण्यासाठी तहसिल कार्यालया समोर सोमवार दिनांक ०५/०३/२०२५ रोजी अमरण उपोषण चालू होते. त्या दरम्यान मा.उपविभागीय अभियंता शंकर बनकर यांनी दिनांक ०८/०३/२०२५ रोजी ठिक दुपारी ०३:०० लेखी पत्र दिल्याने उपोषण सोडण्यात आले होते.



तसेच उपविभागीय अभियंता, खडकवासला उपविभाग क्र.१ दौंड पत्र जा. क्र. ख.पा.उ.अ वि क्र.–१८ दौड / प्रशा/२५९/ सन २०२५ दिनांक :– ०८/०३/२००५ रोजी. पाणी सोडण्याबाबत लेखी पत्र दिलेले आहे.दिनांक १५ मार्च २०२५ ला ठिक १०:०० वाजता १०० क्युसेस ने पाणी सोडले नाही तर १५ मार्च २०२५ ला ठिक ११:०० वाजता मळद ता.दौंड येथे इंदापूरला जाणाऱ्या पाण्याच्या कॅनॉलमध्ये जलसमाधी घेण्यात येणार आहे.

असे निवेदन उपविभागीय अभियंता खडकवासला पाटबंधारे उपविभाग क्र.–१ दौंड यांना भारतीताई लगड यांनी दिले आहे. जलसमाधी घेतल्यानंतर याला जबाबदार फक्त नि फक्त उपविभागीय अभियंता श्री शंकर बनकर हेच राहतील,असे देखील दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे. तसेच याची खबरदारी शासन व प्रशासनाने घ्यावी या जलसमाधी घेण्याच्या ठिकाणी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास शासन व प्रशासन जबाबदार राहील असे भारतीताई लगड शेवटी म्हणाल्या. याबाबत उपअभियंता शंकर बनकर यांना संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.


# भाजपा सदस्य नोंदणी अभियानात सिद्धार्थ धूतराज यांचा खारीचा वाटा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनिल शिंदे**

भारतीय जनता पार्टी संघटन पर्व अंतर्गत राज्यभरात सुरू असणाऱ्या प्राथमिक सदस्यता नोंदणी अभियानात भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सिद्धार्थ धूतराज यांनी दक्षिण विधानसभा अंतर्गत सिडको मंडळात १००० वैयक्तिक सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करीत आपला खारीचा वाटा उचलला आहे

राष्ट्र प्रथम त्यानंतर पक्ष आणि शेवटी स्वतः हा मूलमंत्र मनात ठेवून अंतोदयाच्या दिशेने सुरू असणाऱ्या पक्षाची भूमिका मनात घेऊन त्यांनी हे १००० सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. याआधी संघटनात्मक कार्यात त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे



आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात भारत विश्वगुरु होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे तसेच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र प्रगतीपथावर वेगवान घोडदौड करत आहे. विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्र हे ध्येय साकार करण्यासाठी भारतीय जनता पार्टी अधिकाधिक सशक्त होणे गरजेचे आहे त्यासाठीचे हे संघटन पर्व अतिशय महत्त्वाचे मानले जाते ,या संघटन पर्वात एक हजार सदस्य भाजपा परिवारात सामील करून घेतल्याने सिद्धार्थ धूतराज यांचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस ,भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष मा. रवींद्र चव्हाण,यांनी अभिनंदनचे पत्र पाठवून त्यांच्यावर कौतुकाची थाप मारली आहे .त्यांच्या या कार्याचे कौतुक व अभिनंदन पालकमंत्री मा. अतुलजी सावे, माजी मुख्यमंत्री तथा खासदार मा.अशोकराव चव्हाण खासदार अजित गोपछडे संघटन मंत्री संजयजी कौडगे ,कार्यकारी महानगराध्यक्ष अमरजी राजूरकर साहेब,जिल्हाध्यक्ष (ग्रामीण)डॉ. संतुकराव हंबर्डे , प्रदेश कार्यकारणी सदस्य चैतन्य बापू देशमुख, माजी जिल्हाध्यक्ष प्रवीण भाऊ साले, विजय गंभीरे,शितल खांडील ,बाळू खोमणे,यांनी केले आहे.

# शेतमालाचे बाजारभाव ठरविण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार कारण्याची केली मागणी

## कांदा चाळीसाठी अतिरिक्त अनुदान द्या–आमदार राहुल कुल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

शेतकऱ्यांनी मागणी केल्याप्रमाणे कांदा चाळीला अनुदान देण्यात यावे, आवश्यकता भासल्यास अतिरिक्त अनुदान देण्यात यावे तसेच शेतमालाचे बाजारभाव ठरविण्यासाठी स्वतंत्र धोरण किंवा यंत्रणा तयार कारण्यात यावी अशी मागणी प्रशोत्तराच्या तासादरम्यान अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार राहुल कुल यांनी केली.यावेळी जास्तीत जास्त कांदाचाळी निर्माण व्हाव्यात यासाठी आराखडा तयार करण्यात येईल,त्यासाठी राज्य शासनाचा प्रयत्न सुरु आहे.तसेच तयार होणारे पीक त्याचा पुढील बाजारभाव व त्याचे संरक्षण करण्यासाठी लागणारी व्यवस्था करण्यासाठी पणन मंडळाच्या माध्यमातून आद्ययवत प्रणाली तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यामाध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यात येईल असे आश्वासन पणन मंत्री मा.नामदार श्री जयकुमार रावल यांनी दिले.अशी माहिती आमदार राहुल कुल यांनी दिली.



# गुरुजी फाऊंडेशनने फुलवले चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर समाधान

## जि.प.कन्या शाळा उमरीस दिला स्मार्ट टि.व्ही.भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

दि.१२/०३/२४ रोजी उमरी तालूक्यातील व्हिपीके उद्योग समुहाशी संलग्न गुरुजी फाऊंडेशन ने जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळेतील मुलींना स्मार्ट व तंत्रज्ञानाच्या साह्याने शिक्षण मिळावे म्हणून ५५ इंची टी.व्ही. भेट दिला असून, जिल्हा परिषद कन्या शाळा उमरी येथे झालेल्या कार्यक्रमात उमरी तालूक्याचे गट शिक्षणाधिकारी श्री. नंदकुमार कुलकर्णी व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगिता सिंगरवाड यांना गुरुजी फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री.संदिप पाटील कवळे व संचालिका सौ.पूजा पाटील कवळे(जाधव) व सर्व पदाधिकारी यांनी सूपूर्द केला. याप्रसंगी गट शिक्षणाधिकारी श्री.कुलकर्णी म्हणाले,श्री.मारोतराव कवळे गुरूजी यांनी घालून दिलेल्या आदर्शाचा वारसा त्यांच्या मुलांनी पुढे चालू ठेवला आहे, व्याख्याते (भाषण करणारे) जागोजागी भेटतात पण दाते(दान करणारे) खूप कमी असतातगुरुजी फाऊंडेशनने फुलवले चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर समाधान ,जि.प.कन्या शाळा उमरीस दिला स्मार्ट टि.व्ही. भेट. समाजाच्या हितासाठी श्री.कवळे गुरूजी नेहेमीच अग्रेसर असतात, यापूर्वीही त्यांनी अनेक जि.प. शाळांना संगणक,प्रोजेक्टर भेट दिले आहेत. असेही त्यांनी सांगीतले. माझे वडील व माझे कुटूंब गुरुजी फाऊंडेशनच्या माध्यमातून सातत्याने समाज उपयोगी कार्य करीत आहोत, शाळांच्या सोबतच उमरी धर्माबाद नायगांव तालुक्यात आम्ही शेतकऱ्यांच्या जलसिंचनासाठी बंधारे बांधण्याचे कार्य हाती घेतले आहे, या शाळेस आम्ही




यानंतरही अध्ययन पुरक वस्तु पुराविण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री.संदिप पाटील कवळे व पूजाताई कवळे /जाधव यांनी दिले तर, आम्ही शाळेत शिकतांना मला अनेक अडचणी आल्या,त्या माझ्या बाबांनी सोडविल्या,पण या शाळेत शिकणाऱ्या अनेक मुलींची अडचण सोडविण्याची आर्थीक परिस्थिती त्यांच्या पालकात असतेच असे नाही.मग त्यांच्या शिक्षणाचे काय? हा प्रश्न मला पडला म्हणूनच या शाळेला काहीतरी द्यावे,असा विचार आला व गुरुजी फाऊंडेशनच्या माध्यमातून आम्ही एक पुष्प अर्पन करीत आहोत. याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी श्री शंकर बेळकोणे,केंद्र प्रमुख श्री. संतोष चाटोरीकर यांनी गुरुजी फाऊंडेशनने केलेले कार्य अविस्मरणीय व गौरवपूर्ण आहे.आम्ही त्यांचे आभारी आहोत असे गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमास मा.नगराध्यक्ष श्री.सुभाष पेरेवार,गुरुजी फाउंडेशनचे श्री.लक्ष्मणराव पाटील हारेगांवकर,उपाध्यक्ष श्री. मधुकरराव पाटील बोळसेकर, उत्तमराव होनशेट्टे, सचिव श्री. सुनिल जोगदंड,संचालक तथा कार्यवाह श्री.यु.जी.कदम ( मा. शि.वि.अ.तळेगांव बिट),श्री. बाबूराव भोसले,श्री.प्रशांत कदम नायेगाव,श्री.उत्तमराव जाधव ( मा.संचालक मार्केट कमिटी ) श्री.संदिप बादलवाड( अध्यक्ष शा.व्य.स.केंद्र उमरी), सौ.वर्षा पडोळे( अध्यक्ष कन्या शाळा उमरी),सौ. वर्षा जाधव यांच्यासह अनेक पालक व सर्व शिक्षक उपस्थित होते, आभार प्रदर्शन सौ.वत्सला पाटील यांनी केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904